गणेशोत्सवात रिक्षा, बस वाहतुकीवर प्रशासनाची करडी नजर

अवाजवी भाडे आकारणी, क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहतूक टाळण्याच्या सूचना; रिक्षा-बस वाहतूकदारांची संयुक्त बैठक

रत्नागिरी: पुढारी वृत्तसेवा

गणेशोत्सवाच्या तयारीचा सज्जता आढावा घेत मुंबई-गोवा महामार्गावरून कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास यंदा अधिक सुरक्षित व सुखकर व्हावा, यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. रस्त्यावरील अपूर्ण कामे, सुरक्षेच्या उपाययोजना आणि वाहतूक नियमनाबाबत मोठे पावले उचलली आहेत. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महामार्गावर होणारी गर्दी आणि अपघातांची शक्यता लक्षात घेता परिवहन विभागाने तातडीने महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. गणेशोत्सवात आवाजवी भाडे आकारणी, क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहतूक टाळण्याच्या सूचना शहरातील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात आयोजित रिक्षा व बस वाहतूकदारांच्या बैठकीत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राजवर्धन करपे यांनी दिल्या.

मुंबई-गोवा महामार्गावरील प्रवासाचा मार्ग अधिक सुरक्षित करण्यासाठी प्रशासनाकडून विशेष खबरदारी घेतली जात आहे. महामार्गावर जिथे रस्त्याची कामे अपूर्ण आहेत, तिथे अपघात टाळण्यासाठी तत्काळ रस्ता सुरक्षा फलक, रेडियम टेप्स आणि ब्लिंकर्स बसवण्याचे काम पीडब्ल्यूडी नॅशनल हायवेच्या माध्यमातून युद्धपातळीवर सुरू आहे. उत्सव कालावधीमध्ये या महामार्गांवर वायुवेग पथकांची सतत गस्त असणार आहे. प्रवासादरम्यान जर कोणाचे वाहन अचानक बंद पडले किंवा एखादी दुर्दैवी अपघाताची घटना घडली, तर बाधित प्रवाशांना तातडीने मदत उपलब्ध करून दिली जाईल.

> सर्वसामान्यांचा हा लाडका गणेशोत्सव कोणत्याही विघ्नाशिवाय आणि आनंदाने पार पाडावा, यासाठी सर्व नागरिकांनी व वाहन चालकांनी वाहतुकीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे आणि प्रशासनाला संपूर्ण सहकार्य करावे. **– राजवर्धन करपे,** उपप्रादेशिक परिवहन अधिकारी , रत्नागिरी

याशिवाय, गणेशोत्सवाच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून महामार्गावरील वाहतूक सुरळीत चालण्यासाठी आणि प्रवाशांची कोणतीही फसवणूक होऊ नये म्हणून परिवहन विभागाने रिक्षा आणि खासगी बस संघटनांशी चर्चा केली आहे. प्रवाशांकडून अव्वाच्या सव्वा भाडे उकळणाऱ्या किंवा प्रवाशांशी उद्धट वर्तन करणाऱ्या चालकांवर कठोर कारवाईचा बडगा उगारला जाणार असून, यासाठी उत्सवाच्या काळात वायुवेग पथके विशेष लक्ष ठेवून असणार आहेत. विसर्जनाचे दिवस आणि गर्दीच्या मोसमात महामार्गावरील अवजड वाहतूक बंद ठेवली जाणार आहे, मात्र अत्यावश्यक सेवा आणि जीवनावश्यक वस्तूंची वाहने या नियमातून वगळण्यात आली आहेत. या बैठकीला अप्पर पोलिस अधीक्षक बी. बी. महामुनी, मोटार वाहन निरीक्षक अरविंद फुलारी, पोलिस निरीक्षक प्रवीण रणदिवे यांच्यासह पोलिस व परिवहन विभागाचे अधिकारी तसेच रिक्षा, बस वाहतूकदार संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

रत्नागिरी: रिक्षा व बस वाहतूकदारांच्या बैठकीत मार्गदर्शन करताना अप्पर पोलिस अधीक्षक बी. बी. महामुनी, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राजवर्धन करपे व इतर उपस्थित.

नवी मुंबई विमानतळाची भरारी

३० लाख प्रवाशांचा टप्पा पार, ४६ शहरांशी यशस्वी हवाई जोडणी

पनवेल : विक्रम बाबर

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाने (एनएमआयए) २५ डिसेंबर २०२५ रोजी व्यावसायिक विमानसेवा सुरू केल्यापासून ३० लाख प्रवाशांचा टप्पा ओलांडला आहे. अल्पावधीत साध्य झालेला हा महत्त्वपूर्ण टप्पा भारतातील वेगाने विकसित होणाऱ्या आणि भविष्यातील महत्त्वाच्या हवाई केंद्रांपैकी एक म्हणून नवी मुंबई विमानतळाची होत असलेली वाटचाल अधोरेखित करणारा आहे.

विमानतळाची सक्षम कार्यक्षमता आणि प्रवाशांना केंद्रस्थानी ठेवून दिल्या जाणाऱ्या सेवांमुळे हा महत्त्वाचा टप्पा गाठणे शक्य झाले आहे. ऑगस्ट महिन्यात विमानतळावर सरासरी ९४ टक्के प्रवाशांना त्यांची शेवटची सामानाची बॅग निर्धारित वेळेत मिळाली. ही कामगिरी जागतिक स्तरावरील मानकांशी सुसंगत असून, कार्यक्षम आणि सुरळीत विमानतळ सेवा देण्याच्या विमानतळाच्या बांधिलकीचे प्रतिबिंब आहे.या वाढत्या प्रवासाला आणखी चालना देत नवी मुंबई विमानतळाच्या हवाई मार्गांचे जाळे आता ४० हून अधिक ठिकाणांपर्यंत विस्तारले आहे. मुंबई महानगर प्रदेशाला देशातील प्रमुख शहरांशी जोडण्यात विमानतळाची भूमिका अधिक बळकट होत आहे. उदयपूर, जोधपूर, रांची, दरभंगा, गुवाहाटी आणि सिंधुदुर्ग या सहा नव्या देशांतर्गत ठिकाणांचा विमानतळाच्या हवाई मार्गिकांमध्ये समावेश होणार आहे. त्यामुळे प्रवाशांसाठी उपलब्ध प्रवासाचे पर्याय आणि हवाई संपर्क आणखी वाढणार आहे.३० लाख प्रवाशांचा टप्पा पार करणे हा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विकासप्रवासातील महत्त्वाचा टप्पा आहे. तसेच भारतीय विमान वाहतूक क्षेत्रातील विमानतळाचे वाढते महत्त्व अधोरेखित करणारा हा टप्पा आहे. कार्यक्षम विमानतळ सेवा, विश्वासार्हता आणि प्रवाशांना सुरळीत अनुभव देण्यावर आमचा सातत्याने भर आहे.

९ कोटी प्रवासी,५ लाख मेट्रिक टन मालवाहतूक

अदानी एंटरप्रायझेसची उपकंपनी असलेल्या अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेडच्या पाठबळावर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ भारताच्या वाढत्या विमान वाहतूक क्षेत्रातील पुढील महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित होत आहे. पूर्ण क्षमतेने कार्यरत झाल्यानंतर विमानतळावर दरवर्षी ९ कोटी प्रवाशांची हाताळणी करण्याची क्षमता असेल. तसेच भविष्यासाठी सज्ज सुविधांच्या माध्यमातून दरवर्षी ५ लाख मेट्रिक टन मालवाहतुकीची क्षमता उपलब्ध होणार आहे.

रत्नागिरीत गोवंश कत्तलीचा धक्कादायक प्रकार

रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा

तालुक्यातील फणसवळे-वेतोशी गावच्या वेशीवरील जंगलात बुधवारी मध्यरात्री बेकायदेशीर गोवंश कत्तलीचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. गस्तीदरम्यान कारवाईसाठी गेलेल्या पोलिसांशी तीन संशयितांनी हल्ल्याचा प्रयत्न केल्याने पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले असून दोघे पसार झाले आहेत. या छाप्यात पोलिसांकडून तीन गोवंशीय जनावरे, कार व गोवंशीय जनावरांना बेशुद्ध करण्यासाठी वापरण्यात येणारी इंजेक्शने व हत्यारे जप्त करण्यात आली. गुरुवारी संशयितांना न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना पोलिस कोठडी सुनावली.

मोहसीन बाबू कुरेशी (३०), रा. मुंबई पूर्व) व शहेनशहा अब्दुल सत्तार शेख (४८) अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. तर अस्लम कुरेशी (वांद्रा कुर्ला मुंबई) हे दोघे फरार आहेत. संशयितांकडून एका गोवंशीय जनावराचे मांस काढण्यात येत होते. मध्यरात्री १ ते पहाटे ४ या कालावधीत संशयित गोवंशीय जनावरांचे मांस काढून त्याची मुंबईला विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना दिली.

नोकरी मागणारे नव्हे, रोजगार देणारे बना !

विकसित भारताचे दूत बनण्याचा राज्यपालांनी बाटूच्या दीक्षांत समारंभात विद्यार्थ्यांना दिला कानमंत्र

माणगाव : कमलाकर होवाळ

भारताच्या विकसित राष्ट्राच्या प्रवासाची दिशा केवळ महानगरा पुरती मर्यादित राहणार नसून गावा गावांत, लहान शहरांत आणि विद्यापीठांच्या माध्यमातूनही विकासाची नवी पहाट उगवणार आहे. त्यामुळे पदवीधर विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या संधी शोधणारे न बनता रोजगार निर्माण करणारे, नवनिर्मिती करणारे आणि समाजाच्या ज्वलंत समस्या सोडविणारे अभियंते बनावे. शेती, पाणी, आरोग्य, शिक्षण तसेच ग्रामीण उप जीविकेतील प्रत्यक्ष समस्या सोडविण्यासाठी अभियांत्रिकी ज्ञान, आधुनिक तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करावा, असे आवाहन राज्यपाल जिष्णुदेव वर्मा यांनी केले.

लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या २८ व्या दीक्षांत समारंभात राज्यपाल वर्मा बोलत होते. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, रोजगार हमी योजना मंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री भरत गोगावले, महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. राजनिश कामत, कुलसचिव प्रा. अमित शेष, परीक्षा नियंत्रक डॉ. गीतांजली महामुणकर यांच्यासह विद्यापीठाचे अधिकारी, प्राध्यापक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.पदवी प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना राज्यपाल वर्मा म्हणाले की, विद्यार्थी आता तीव्र स्पर्धा, मोठ्या संधी आणि विविध आव्हानांनी भरलेल्या जगात प्रवेश करीत आहेत. राष्ट्राची प्रगती ही संशोधन, नवनिर्मिती आणि नव्या कल्पनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर अवलंबून आहे. नवीन कल्पना सुचणे हा शोधाचा भाग असू शकतो; मात्र त्या कल्पनेचा उत्पादक, समाजोपयोगी आणि व्यापक परिणाम घडवून आणणारा वापर म्हणजे खरी नवनिर्मिती होय. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मनात येणाऱ्या चांगल्या कल्पना केवळ विचारांच्या पातळीवर न ठेवता त्यांचे कृतीत रूपांतर करावे, असे त्यांनी सांगितले. डिजिटल इंडिया, स्किल इंडिया, स्टार्ट-अप इंडिया, मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारताच्या माध्यमातून देशाने युवकांना कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी सक्षम परिसंस्था निर्माण केली आहे. या संधींचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. असे आवाहनही राज्यपालांनी केले.

सिंधुदुर्ग सीईओपदी अपूर्वा बासूर

सिंधुदुर्गनगरी : पुढारी वृत्तसेवा

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी (CEO) अपूर्वा बासूर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागाने गुरुवार ३ सप्टेंबर रोजी त्यांच्या नियुक्तीचे आदेश काढले. तर जि. प. चे विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र खेबूडकर, यांची बदली आयुक्त, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे या पदावर करण्यात आली आहे. अवघ्या दीड वर्षांच्या कालावधीतच खेबूडकर यांची बदली झाल्याने त्यांच्या बदलीमागील कारणाबाबत चर्चा सुरू झाली आहे. अपूर्वा बासूर या सध्या जव्हार येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तसेच सहा. जिल्हाधिकारी, जव्हार उपविभाग म्हणून कार्यरत आहेत. शासनाने बढती देत त्यांची नियुक्ती सिंधुदुर्ग जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून केली आहे.

मध्य रेल्वे

शुद्धीपत्रक क्र. १

निविदा क्र. २७.२६.३९७१, विभाग/रेल्वे स्टोअर्स/मध्य रेल्वे **बंद होणार : १५.०९.२०२६ निविदा शिर्षक** - रोटर स्टँपिंगचा संच **सुधारणा. क्षेत्र नाव - निविदा खुले होण्याचा दिनांक/वेळ : सध्याचा दिनांक** ०७.०९.२०२६ ११.३० **सुधारित दिनांक** १५.०९.२०२६ ११.३०

अनधिकृतपणे रेल्वे रुळ ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे

529

M.A. No. 5/2025

IN THE COURT OF 1st ADDITIONAL SENIOR CIVIL JUDGE COURT HUBBALLI

Appellant: Smt Leela W/o Bharat Kattimani

V/S

Respondent No. 2: SMT. MERI W/O GEBRIAL DAMMU, AGE: 60, OCCUPATION: W/H, R/O: FLAT NO. 001 APARTMENT GOVINDDHAM COMPLEX, MANJADI, BADLAPUR, WEST THANE-4215037

Under Order 5 Rule 20(2) of the Code of Civil Procedure
Court Notice

In the above case, the appellant have filed a misilenious appeal against the order of the Hon'ble **2nd Additional Civil Judge (Junior Division) And 3rd JMFC Hubli, Dated 06-02-2025, On I.A. No. 3** by allowing the said I.A. of the respondent No.1 plaintiff, being filed **Under Order XXXIX Rule 1&2 R/W Section 151 CPC. in O.S. No. 542/2024,** suit seeking a injunction order regarding the suit property and the 2nd in the said M.A., **SMT. MERI W/O GEBRIAL DAMMU, AGE: 60, OCCUPATION: W/H, R/O: FLAT NO. 001 APARTMENT GOVINDDHAM COMPLEX, MANJADI BADLAPUR, WEST THANE, 4215037,** has been appointed for his appearanc on 21-09-2026 at 10-45 am, and he should appear in person or through his lawyer and submit his dispute and statement, if any in the said case. In default, the court will pass an ex parte order.

Given under the seal of the court this day: 31st August 2026. (Court Seal)

Hubli

Signed/- Head of the Hon'ble 1st Addl. Senior Civil Court, Hubli by order of the Court)

Sd/- **B.G. Hiremath,** Advocate
Hubballi (8747063626)

जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापनात)

नोंदणीकृत कार्यालय - स्टर्लिंग सेंटर, ४०१-४०७, ४था मजला, डिवाईन चाईल्ड हायस्कूल समोर, अंधेरी कुर्ला रोड, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई महा. ४०००९३
सीआयएन : L99999MH1992PLC066213
(मा. एनसीएलटी च्या दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ च्या आदेशानुसार परिसमापन प्रक्रियेतून जाणारी कंपनी)

ई-लिलावासाठी जाहीर उद्घोषणा

दि इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्सी कोड, २०१६ आणि त्याअंतर्गत बनवलेल्या नियमावलींनुसार नोटीस

याद्वारे अधोस्वाक्षरीकारांकडून सर्वसामान्य जनतेला नोटीस देण्यात येते की, जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेड (परिसमापनात) (**"कॉर्पोरेट कर्जदार"**) च्या मालकीच्या १४ (चौदा) मालमत्तांच्या (खालील तक्त्यात नमूद केलेल्या) विक्रीसाठी ई-लिलाव मागवण्यात येत आहेत, ज्या इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्सी कोड, २०१६ **("IBC")** च्या तरतुदींनुसार, त्यांतर्गत बनवलेल्या नियमांनुसार कॉर्पोरेट कर्जदाराच्या परिसमापन संपत्तीचा भाग आहेत, आणि ही विक्री जसे आहे जेथे आहे, जसे आहे जसे दिसते, जसे आहे तसे, जे काही उपलब्ध आहे ते आणि कोणत्याही दायित्वाशिवाय तत्त्वावर, कोणत्याही प्रतिनिधीत्व, हमी किंवा भरपाईशिवाय केली जाईल. ही विक्री अधोस्वाक्षरीकारांमार्फत https://ibbi.baanknet.com (**"ई-लिलाव प्लॅटफॉर्म"**) या ई-लिलाव प्लॅटफॉर्म BAANKNET (पूर्वीचे eBkray) द्वारे, इतर बाबींसह, IBBI (Liquidation Process) Regulations, २०१६ चे नियम ३२ आणि दिनांक ४ सप्टेंबर २०२६ (**"एएसपीएम"**) चे मालमत्ता विक्री प्रक्रिया ज्ञापन नुसार आयोजित केली जाईल. सर्व इच्छुक बोलीदारांनी कृपया नोंद घ्यावी की सर्व पात्रता कागदपत्रे आणि इसारा रक्कम ही संबंधित एएसपीएमच्या क्लॉज ४ (पात्रता कागदपत्रे) मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रे सादर करण्याच्या अटींनुसार, पूर्णपणे आणि केवळ ई-लिलाव प्लॅटफॉर्मवरच सादर करणे आवश्यक आहे.

ई-लिलावासाठी महत्त्वाच्या तारखांचे वेळापत्रक

पात्रता कागदपत्रे आणि कलम २९अ अंतर्गत हमीपत्र ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ	मंगळवार, ६ ऑक्टोबर २०२६, संध्याकाळी ५:०० वाजता (युटीसी+५.३०)
ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर इसारा रक्कम ठेव (**"ईएमडी"**) जमा करण्याची अंतिम तारीख आणि वेळ	मंगळवार, ६ ऑक्टोबर २०२६, रात्री ८:०० वाजता (युटीसी+५.३०)
ई-लिलावाची तारीख आणि वेळ	गुरुवार, ८ ऑक्टोबर २०२६, सकाळी ९:०० ते संध्याकाळी ७:०० वाजेपर्यंत (युटीसी+५.३०)
अंतिम विक्री मोबदला भरण्याची अंतिम तारीख	खाली स्वाक्षरी करणारे यांच्याद्वारे अंतिम विक्री मूल्य भरण्याची मागणी करणारे पत्र जारी केल्याच्या साठ (६०) दिवसांच्या आत

रक्कम भारतीय रूपयांत

अनु. क्र.	मालमत्तेचे वर्णन	मालमत्ता आयडी	लिलाव आयडी	राखीव मूल्य*	इसारा रक्कम ठेव (ईएमडी)	बोली वाढीचे मूल्य
१	बोईंग ७३७ मॅक्स - उच्च-मूल्य प्रणाली, एव्हिओनिक्स आणि केबिन	४२१८	४७४८	२,०१,७८,११९	२०,१७,८१२	१०,०८,९०६
२	बोईंग ७३७ मॅक्स - उपभोग्य वस्तू, हार्डवेअर आणि फास्टनर्स	४२१९	४७४९	५,५३,०९,५३७	५५,३०,९५४	२७,६५,४७७
३	बोईंग ७३७ एनजी - इन-फ्लाइट मनोरंजन, केबिन आणि सुरक्षा प्रणाली	४२२०	४७५०	१२,५६,३४,४९८	१,२५,६३,४५०	६२,८१,७२५
४	बोईंग ७३७ एनजी - एव्हिओनिक्स, ॲक्ट्युएटर्स आणि मेकॅनिकल	४२२१	४७५१	२,५८,६५,०१०	२५,८६,५०१	१२,९३,२५०
५	बोईंग ७३७ एनजी - उपभोग्य वस्तू, फास्टनर्स आणि हार्डवेअर	४२२२	४७५२	१३,०७,६४,७७७	१,३०,७६,४७८	६५,३८,२३९
६	एटीआर ७२ - केबिन, इंटिरियर आणि उच्च-मूल्य प्रणाली	४२२३	४७५३	२,७४,३०,८४३	२७,४३,०८४	१३,७१,५४२
७	एटीआर ७२ - उपभोग्य वस्तू, हार्डवेअर आणि फास्टनर्स	४२२४	४७५४	६,०९,६४,३२७	६०,९६,४३३	३०,४८,२१६
८	ए३३०/ए३३२/ए३४३ - वाईड-बॉडी एअरबस साठा	४२२५	४७५५	८,४५,५५,३१२	८४,५५,५३१	४२,२७,७६६
९	बी७७७ - वाईड-बॉडी बोईंग साठा	४२२६	४७५६	१२,२४,३५,८६३	१,२२,४३,५८६	६१,२१,७९३
१०	मिश्र वाईड-बॉडी साठा - ए३३०/बी७७७/क्लासिक्स	४२२७	४७५७	२,९९,४९,१४५	२९,९४,९१५	१४,९७,४५७
११	क्रॉस-प्लॅटफॉर्म साठा (सर्व प्रकारच्या विमानांसाठी)	४२२८	४७५८	५५,३०,३५३	५,५३,०३५	२,७६,५१८
१२	जुना, संकीर्ण आणि अवर्गीकृत साठा	४२२९	४७५९	२१,०६,१४,१६१	२,१०,६१,४१६	१,०५,३०,७०८
१३	ऑपरेटर-विशिष्ट सानुकूलित वस्तू (ड्रेस कव्हर्स, आर्मकॅप्स, डिकल्स)	४२३०	४७६०	२,९३,४९,७७३	२९,३४,९७७	१४,६७,४८९
१४	ग्राउंड सपोर्ट उपकरणे आणि टूलींग	४२३१	४७६१	४,९०,०१२	४९,००१	२४,५०१

*इतर बाबींसह कर, उपकर, अधिभार, शुल्क, हस्तांतरण शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, प्रीमियम आणि विक्री पूर्ण करण्यासाठी लागणारे इतर सर्व लागू खर्च वगळून; ज्याचे सविस्तर वर्णन संबंधित एएसपीएम च्या कलम १९ (खर्च, व्यय आणि कर परिणाम) मध्ये केले आहे. अधोस्वाक्षरीकारांकडून अथवा नुकसानभरपाई प्राप्त पक्षांकडून (संबंधित एएसपीएम मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे) कोणतेही प्रतिनिधित्व, हमी किंवा भरपाई दिली जाणार नाही.

महत्त्वाच्या नोंदी:

१. बँकनेट पोर्टलवर वर नमूद केलेल्या १४ (चौदा) मालमत्तांसाठी १४ (चौदा) स्वतंत्र ई-लिलाव आयोजित केले जातील.
२. ही विक्री नोटीस मालमत्तांचा तपशील, घोषणापत्रे, शपथपत्रे आणि आयबीसी च्या कलम २९अ अंतर्गत पात्रता हमीपत्रांचा समावेश असलेल्या संबंधित एएसपीएम सोबतच, वरील मालमत्ता आणि लिलाव क्रमांकांसमोर https://ibbi.baanknet.com/auction-listing वर किंवा कॉर्पोरेट कर्जदाराच्या www.jetairways.com या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या 'ई-लिलाव विक्रीच्या सर्वसाधारण आणि तांत्रिक अटी व शर्तीसह' एकत्रितपणे वाचली जावी.
३. सर्व परदेशी बोलीदारांनी या प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी संबंधित एएसपीएमच्या पुरवणी पत्राची नोंद घेणे आवश्यक आहे. परदेशी बोलीदारांना संबंधित एएसपीएम दिनांक ४ सप्टेंबर २०२६ मध्ये दिलेल्या ईएमडी सादरीकरणाच्या विहित नोंदणी प्रक्रिया, कालमर्यादा, पात्रता निकष आणि अटींचे काटेकोरपणे पालन करण्याची विनंती केली जाते.
४. इच्छुक बोलीदारांनी आवश्यक पात्रता कागदपत्रे आणि ईएमडी केवळ आणि केवळ ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारेच, संबंधित एएसपीएमच्या कलम ४ (पात्रता कागदपत्रे) नुसार विहित मुदतीत सादर करावी; लिक्विडेटरकडे थेट पाठवू नये.
५. ई-लिलाव प्लॅटफॉर्म तसेच कागदपत्रे व ईएमडी जमा करण्यासंदर्भातील कोणत्याही तांत्रिक अडचणी किंवा शंकांसाठी, इच्छुक बोलीदारांनी बँकनेटशी +९१ ८२९१२२०२२० या क्रमांकावर किंवा support.baanknet@psballiance.com या ईमेलवर संपर्क साधावा.
६. ई-लिलावाच्या प्रक्रियेशी संबंधित इतर चौकशीसाठी, कृपया लिक्विडेटरचे अधिकृत प्रतिनिधी श्री. श्लोक नांदनपवार यांच्याशी फोन क्र. +९१-८२०८५०३६९३ वर किंवा jetliquidation@in.ey.com आणि liquidation.jet@gmail.com या ईमेल पत्त्यांवर संपर्क साधावा. ईमेलचा विषय "Engineering Asset Sale-Delhi Consumables" असा असावा. कृपया नोंद घ्यावी की पात्रता किंवा बोलीसंदर्भातील कोणतीही मूळ कागदपत्रे लिक्विडेटर, त्यांचे प्रतिनिधी अथवा त्यांच्या सल्लागारांकडे सादर करू नयेत.
७. हे स्पष्ट करण्यात येते की, या नोटीसमुळे अधोस्वाक्षरीकारांवर अथवा जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेडवर (परिसमापनात) विक्री पूर्ण करण्याचे कोणतेही कायदेशीर बंधन निर्माण होत नाही. या प्रक्रियेत अधोस्वाक्षरीकारांनी घेतलेला कोणताही निर्णय सर्व बोलीदारांवर अंतिम आणि बंधनकारक राहील.
८. हे स्पष्ट करण्यात येते की, येथे आणि संबंधित एएसपीएममध्ये दिलेला मालमत्तेचा तपशील हा केवळ प्राथमिक माहिती व संदर्भासाठी दिला गेला आहे. संबंधित एएसपीएममध्ये नमूद नुकसानभरपाई प्राप्त पक्ष हे मालमत्तेच्या वर्णनात, स्थितीत आढळणारी कोणतीही चूक, त्रुटी, विसंगती, चुकीचे विधान, वगळलेला भाग, बदल अथवा कमतरतेसाठी कोणतीही कायदेशीर जबाबदारी स्वीकारत नाहीत; मग अशी तफावत लिलावापूर्वी, दरम्यान अथवा लिलाव प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निदर्शनास आलेली असो. मालमत्तेची विक्री ही पूर्णपणे जसे आहे जेथे आहे, जसे आहे जसे दिसते, जसे आहे तसे, जे काही उपलब्ध आहे ते आणि कोणत्याही दायित्वाशिवाय या तत्त्वावर कोणत्याही प्रतिनिधित्व, हमी किंवा भरपाईशिवाय आयोजित केली आहे.
९. अंतिम विक्री मोबदल्याचा भरणा हा संबंधित एएसपीएमच्या कलम १५ (अंतिम विक्री मोबदला भरणे) आणि कलम १६ (विक्री पूर्ण करणे) मध्ये नमूद केलेल्या कालमर्यादा, व्याज आकारणीच्या तरतुदी आणि रक्कम जप्तीच्या अटींच्या अधीन राहील.
१०. लिक्विडेटर यांना कॉर्पोरेट कर्जदाराच्या सावकारांच्या समितीच्या सल्ल्यानुसार, लागू कायद्यांतर्गत दिलेल्या अधिकारांनुसार, कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर ही ई-लिलाव प्रक्रिया रद्द करण्याचा किंवा थांबवण्याचा पूर्ण अधिकार राहील.

स्वाक्षरी/-
सतिश कुमार गुप्ता
जेट एअरवेज (इंडिया) लिमिटेडचे अवसायक
आयपी नोंदणी क्र. : IBBI/IPA-001/IP-P00023/2016-17/10056
एएफए क्र. - AA1/10056/02/311226/108454
एएफए वैधता डिसेंबर ३१, २०२६ पर्यंत
ईमेल : liquidation.jet@gmail.com

दिनांक : ०४.०९.२०२६
ठिकाण : मुंबई

एल्&टी फायनान्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: एल्&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
CIN No.: L67120MH2008PLC181833
शाखा कार्यालय:मुंबई

L&T Finance

ताबा सूचना
(नियम-8(1)

निम्नस्वाक्षरीकर्ता वित्तीय संपदांचे प्रतिभूतीकरण आणि पुनर्बांधकाम आणि प्रतिभूती स्वारस्याची अंमलबजावणी कायदा, 2002 अंतर्गत एल्&टी फायनान्स लिमिटेडचा प्राधिकृत अधिकारी असून त्याने, सदर कायद्याचे कलम 13(12) व सोबत वाचला जाणारा प्रतिभूती स्वारस्य (अंमलबजावणी) नियम, 2002 चा (नियम 3) यांअन्वये प्राप्त शक्तींचा वापर करत, एक मागणी सूचना प्रसृत केली जिच्यामध्ये त्याने कर्जदाराला / सहकर्जदाराला आणि हमीदारांना खाली जोडलेल्या मागणी सूचनेमध्ये उल्लेखित रकमेची व मागणी सूचनेच्या दिनांकापासून पैसे भरेपर्यंतच्या / वसुल होण्यापर्यंतच्या दिनांकापर्यंत चढलेले पुढील व्याज आणि इतर शुल्के यांसोबत सदर सूचना मिळाल्याच्या दिनांकापासून 60 दिवसांच्या आत परतफेड करण्यासाठी संबोधले होते. कर्जदाराने / सहकर्जदारांनी / हमीदारांनी रकमेची परतफेड न केल्याने, याद्वारे कर्जदाराला / सहकर्जदारांला / हमीदारांना व सर्वसाधारण जनतेला सूचना देण्यात येते की निम्नस्वाक्षरीकर्त्याने या सूचनेमधील उक्त कायद्याचे कलम 13 व सोबत वाचला जाणारा उक्त नियमांमधील नियम 8 यांद्वारे प्राप्त शक्तीचा वापर करत येथे खाली उल्लेखित मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

कर्ज खाते क्रमांक	कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्सचे नाव	गहाण मालमत्तेचा तपशिल	मागणी सूचना		ताबा घेतल्याची तारीख व प्रकार
			दिनांक	थकित रक्कम (₹)	
H00152120722025600, H00152120722025600G, H00152120722025600L	1)हेमांग वरय्या कर्जदार म्हणून 2)मोनल वरय्या सहकर्जदार म्हणून	फ्लॅट क्र. ए-6403 अधिमापन 1062 चौ.फू. चटई क्षेत्रफळ + 30 चौ.फू. ईबीव्हीटी क्षेत्रफळ एकूण 1092 चौ.फू. निव्वळ चटई क्षेत्रफळ 64वा मजला, 'ए' विंग, इमारतीचे नाव 'पार्कसाइड'. प्रकल्पाचे नाव 'लोधा पार्क'. कॅडेस्टल सर्व्हे क्र. 464 असलेल्या जमिनीवर, लोअर परेल डिव्हिजन, मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये, नोंदणी जिल्हा मुंबई शहरामध्ये.	18-05-2026	14-05-2026 रोजीनुसार रु. 4,87,80,913.37/-	02-09-2026 प्रतीकात्मक ताबा

कर्जदार/सहकर्जदार आणि गॅरेन्टर्स यांना खास करून आणि सर्वसाधारण जनतेला याद्वारे सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार न करण्याची खबरदारीची सूचना देण्यात येत आहे आणि सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार केल्यास तो एल्&टी फायनान्स लिमिटेड यांना मागणी सूचनेत नमूद करण्यात आलेली रक्कम आणि त्यासोबत मागणी सूचनेपासून ते पैसे अदा करेपर्यंत/वसूल होईपर्यंत अधिक व्याज व इतर शुल्क इत्यादी भरण्याच्या अधीन असेल.

दिनांक: 04.09.2026
ठिकाण: मुंबई

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल्&टी फायनान्स लिमिटेड

प्राशिक एस.आर.ए. को. ऑप. हौसिंग सोसायटी (मर्या)
इमारत क्र. १७, नवीन म्हाडा वसाहत, मानखुर्द, मुंबई- ४०००४३

उपरोक्त संस्थेच्या सभासदाचे निधन त्या तारखेला झाले असून त्यांच्या नावासमोर नमुद केलेल्या वारसांनी त्यांची सदनिका/गाळा तसेच भाग भांडवल आपले नावे हस्तांतरित करण्यासाठी संस्थेकडे विहित नमुन्यात अर्ज केले आहेत. सदरहू मृत सभासदाने नामनिर्देशित केलेले नाही.

मयत सभासदाचे नाव	मृत्युची तारीख	सदनिका नं	वारसाशी नाते	वारसाचे नांव
कै. श्री. खान सलीम शेरा	२०.०५.२०२०	४०५	मुलगा	श्री. रईस सलीम शेरा खान

संस्था या नोटीसद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सभासदांचे भाग व हितसंबंध हस्तांतरीत करण्यासंबंधी मयत सभासदांचे वारसदार किंवा अन्य मागणीदार/हरकतदार यांच्या कडुन हक्क मागण्या/हरकती मागविण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन १४ दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतीच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमुद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर मयत सभासदाचे संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील भाग व हीतसंबंध यांच्या हस्तांतरणाबावत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर असा कोणत्याही हक्क मागण्या/हरकती आल्या तर त्यावावत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधीची एक प्रत मागणीदारांस/हरकतदारास पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांच्याकडे सायं ७ ते ९ या वेळेत नोटीस दिल्याच्या तारखेपासून नोटीसची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

ठिकाण: मानखुर्द, मुंबई- ४३ — प्राशिक एस.आर.ए. को-ऑप. हौसिंग सोसायटी (मर्या)
दिनांक: ०४.०९.२०२६ — सही /-सचिव

TATA

टाटा कॅपिटल हाउसिंग फायनांस लिमिटेड

पंजीकृत कार्यालय: ११वीं मंजिल, टॉवर ए, पेनिनसुला बिजनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०००१३.
कॉर्पोरेट पहचान संख्या: U67190MH2008PLC187552 वेबसाइट: www.tatacapital.com

शाखा बंद करण्याबाबत जाहीर सूचना

टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (कंपनी), ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय ११ वा मजला, टॉवर ए, पेनिनसुला बिझनस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परळ, मुंबई – ४०० ०१३, महाराष्ट्र, भारत येथे आहे, याद्वारे आपले ग्राहक आणि संबंधित सर्वांना सूचित करत आहेत की, कंपनीची खाली नमूद केलेली शाखा **दिनांक ०८ डिसेंबर २०२६** पासून बंद केली जात आहे:

शाखा कार्यालयाचा पत्ता (बंद करण्याचे प्रस्तावित):
१ ला मजला, माधव आशीर्वाद इमारत, नगरपालिकेच्या रुग्णालयाजवळ, बाजारपेठ, खोपोली, खालापूर, रायगड, महाराष्ट्र – ४१०२०३

कोणत्याही शंका / तक्रारीसाठी कृपया **customercare.housing@tatacapital.com** या ई-मेल आयडीवर संपर्क साधावा.

टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड करिता आणि त्यांच्या वतीने

स्थान : मुंबई — **प्रदीप पुरी**
दिनांक : ४ सप्टेंबर, २०२६ — **मुख्य अनुपालन अधिकारी**

O.S. No.44/2012

IN THE COURT OF THE HON'BLE SENIOR CIVIL JUDGE, CHIKODI AT: CHIKODI

BETWEEN:
1. Sakubai Appa Vibhute of Shirgaon and others. ....Plaintiffs
AND:
1. Basaprabhu Tippanna Vibhute of Shirgaon and others. ....Defendants

PUBLIC NOTICE / PAPER PUBLICATION

TO : Proposed Defendant No.33: Smt. Sukindra W/o Bhima Khare, Age: 82 years, Occ: Household Work, R/o: Labour Camp, Matunga, Mumbai.

1. WHEREAS, the above-named plaintiffs have instituted O.S. No.44/2012 before this Hon'ble Court for partition and separate possession in respect of the suit schedule properties against the defendants, and the said suit is pending for consideration before this Hon'ble Court.
2. WHEREAS, during the pendency of the suit, the plaintiffs/applicants have sought to bring you, Smt. Sukindra W/o Bhima Khare, as Proposed Defendant No.33, on record as a necessary/proper party to the proceedings, and notice was ordered to be issued to you.
3. WHEREAS, despite issuance of notice at your known address, service of notice could not be effected upon you in the ordinary manner.
Therefore, this Hon'ble Court has permitted substituted service of notice upon you by way of publication in a newspaper under Order V Rule 20 of the Code of Civil Procedure, 1908.
4. NOW THEREFORE, notice is hereby given to you, Proposed Defendant No.33- Smt. Sukindra W/o Bhima Khare, that you shall appear before this Hon'ble Court, either personally or through a duly engaged Advocate, and file your objections, if any, in the above proceedings.
5. The above matter is posted for hearing on 13/10/2026 at 11.00 A.M. before the Hon'ble Senior Civil Judge, Chikodi.
6. You are hereby called upon to appear before this Hon'ble Court on the said date and contest the proceedings, if you so desire. In the event of your failure to appear before this Hon'ble Court on the aforesaid date, the matter will be proceeded with and appropriate orders will be passed in your absence, in accordance with law. GIVEN under the authority and seal of this Hon'ble Court at Chikodi.

Place: Chikodi
Date: 3/9/2026

Sd/- Shri. D. B. Killedar, Advocate for Plaintiffs
(Court Seal) Sd/- Bench Clerk, Senior Civil Judge Chikodi
Sd/- Shirastedar, Senior Civil Judge Chikodi

बृहन्मुंबई महानगरपालिका

सार्वजनिक आरोग्य खाते
शिवाजीनगर प्रसूतिगृह, गोवंडी

एच.ओ./३१३/एस.एन. एम. एच. दि. ०३.०९.२०२६

विषय : एम/पूर्व अंतर्गत शिवाजीनगर प्रसुतिगृहात कंत्राटी तत्वावर कामगार आणि कर्मचारी घेण्याबाबत.

जाहिरात

वरील विषयान्वये एम/पूर्व विभागाअंतर्गत महानगरपालिकाकडे नोंदणीकृत असलेल्या स्थनिक अशासकीय सेवाभवी संस्थांना या जाहीरातीव्दारे असे कळविण्यात येते की, शिवाजीनगर प्रसुतिगृहासाठी 'ड' संवर्गातील कंत्राटी कामगार ६ महिन्याकरिता (आया, स्त्री-सफाईगार, हमाल) इ. आवश्यकता आहे.

स्वयंसेवी संस्था (एन.जी.ओ) कंत्राटी कामगार पुरवू इच्छीतात त्यांनी प्रत्यक्ष कार्यालयात हजर राहून रु. 7986/- + GST 18% रु. 1437/- एकुण रु. 9423/- भरून दि.04.09.2026 ते दि.15.09.2026 पर्यंत सकाळी 10:30 ते सायंकाळी 03:00 वाजेपर्यंत आपले अर्ज खाली नमूद केलेल्या कार्यालयात सुटटीचे दिवस वगळता कार्यालयीन वेळेत सादर करावेत. हे अर्ज लॉटरी पध्दतीने वैद्यकीय अधिकारी शिवाजीनगर प्रसुतिगृह एम/पूर्व यांच्या दालनात उघडण्यात येईल.

पत्ता :- वैद्यकीय अधिकारी
शिवाजीनगर प्रसुतिगृह, तिसरा मजला, अहिल्याबाई होळकर मार्ग,
शिवाजीनगर, गोवंडी (पश्चिम)- 400043.
Mb. 9619641490

सही/-
वैद्यकीय अधिकारी
शिवाजीनगर प्रसुतिगृह

PRO/1313/ADV/2026-27

आठवड्याचा एक दिवस कोरडा दिवस म्हणून पाळा.

मुरुडे सहकारी पतसंस्था मर्यादित, मुंबई,
रजि. नं. : बी.ओ.एम./आर.एस.आर./325 सन 1966
58, शिवाजीनगर को-ऑप. हौसिंग सोसायटी, ना.म. जोशी मार्ग, मुंबई-400013

60 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची 60 वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक 26 सप्टेंबर 2026 रोजी सकाळी ठिक 9.30 वा. कै. गोपाळ शेट्टीगार सभागृह," बाळ दंडवते स्मृती " पहिला मजला, बावला मस्जिद समोर, ना. म. जोशी मार्ग, मुंबई - 400013. येथे संस्थेचे अध्यक्ष मा. ॲड नेताजी रामचंद्र मोकाशी यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत करण्यात आली आहे. सदर सभेत खालील विषयांवर चर्चा करण्यांत येणार असून सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे. ही विनंती.

*** सभेपुढील कामकाज ***

1) दिनांक 14 सप्टेंबर 2025 रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
2) संस्थेच्या संचालक मंडळाने सन 2025-2026 सालाचा सादर केलेला वार्षिक अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रकास मंजूरी देणे.
3) संचालक मंडळाने कायदा व नियम यास अनुसरुन शिफारस केल्याप्रमाणे सन 2025-2026 सालाच्या नफा विभागणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे.
4) सन 2025-2026 सालाच्या वैधानिक लेखापरिक्षण व अंतर्गत लेखापरिक्षण अहवालावर विचार विनिमय करुन स्विकृत करणे.
5) सन 2026-2027 सालाकरीता वैधानिक, अंतर्गत व टॅक्स लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांना देण्यात येणाऱ्या मानधनास मान्यता देणे.
6) सन 2025-2026 सालाच्या अंदाज पत्रकातील जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे व सन 2026-2027 सालाच्या अंदाज पत्रकांस मान्यता देणे.
7) सन 2024-2025 सालाच्या लेखापरिक्षणातील दोष- दुरुस्ती अहवालास मंजूरी देणे.
8) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती देणे.
9) मा. सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थाना लागू केलेला सुधारित आदर्श उपविधी 2025 स्विकृत करणे.
10) संस्थेचे प्रशासकीय कार्यालय, 58, शिवाजी नगर, ना. म. जोशी मार्ग, मुंबई - 13, येथून संस्थेच्या ठाणे शाखेत स्थलांतरीत करणेबाबत.
11) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

स्थळ : मुंबई — **संचालक मंडळाच्या आदेशावरुन**
दिनांक : 4 सप्टेंबर 2026 — **श्री. अशोक मारुती पाटील**
Email: murude1966@gmail.com — **कार्यलक्षी संचालक**

*** सूचना ***

1) गणसंख्ये अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच ठिकाणी सकाळी 10:00 वाजता सभा भरविण्यात येईल त्यावेळी गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.
2) वार्षिक अहवाल संस्थेमध्ये कार्यालयीन वेळेत येऊन घेऊन जावे.
3) ज्या सभासदांना अहवाल व हिशोबाची परिशिष्टे यावर कोणतेही प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी आपले लेखी प्रश्न संस्थेच्या कार्यालयीन वेळेमध्ये दिनांक 21 सप्टेंबर 2026 पर्यंत कार्यालयात आणून द्यावेत. आयत्यावेळी आलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे बंधनकारक राहणार नाही.
4) सभेस बिगर सभासदांना प्रवेश दिला जाणार नाही.